भारत उपांत्य फेरीत

वर्ल्ड कप ज्युनिअर क्रिकेट स्पर्धेत बांगलादेशविरुद्ध विजय

वृत्तसंस्था, ओसबॅन (अँटिग्वा)

रविकुमार आणि विकी ओस्तवाल यांच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने शनिवारी वर्ल्ड कप १९ वर्षाखालील वनडे क्रिकेट स्पर्धेत गतविजेत्या बांगलादेशला पाच विकेटनी हरवले आणि उपांत्य फेरी गाठली. गेल्या वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत बांगलादेशने भारताला नमविले होते. भारताने या विजयासह मागील पराभवाचीही परतफेड केली. आता उपांत्य फेरीत भारताची ऑस्ट्रेलियाशी २ फेब्रुवारीला लढत होईल.

भारताने बांगलादेशला अवघ्या १११ धावात गुंडाळून विजयपथावरील वाटचाल सुरू केली. भारताने ११२ धावांचे लक्ष्य पाच विकेटच्या मोबदल्यात ३१व्या षटकात पार केले. लक्ष्याचा पाठलाग करताना हरनूरसिंग शून्यावर बाद झाला. यानंतर अंगक्रिश आणि शेख रशीदने ७० धावांची भागीदारी रचली. अंगक्रिश आणि रशीद एकापाठोपाठ बाद झाले. सलामीवीर

भारतीय ज्युनिअर क्रिकेट संघाचा आनंद

अंगक्रिश रघुवंशीने ६५ चेंडूत सात चौकारांसह ४४ धावांची, तर रशीद शेखने ५९ चेंडूत तीन चौकारांसह २६ धावांची खेळी केली. यानंतर सिद्धार्थ यादव (६) आणि राज बावा (०) बाद झाले. कर्णधार यश धूलने कौशल तांबेला साथीला घेत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

तत्पूर्वी, भारतीय संघाचा कर्णधार यश धूलने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. हा निर्णय गोलंदाजांनी सार्थ ठरवला. रविकुमारच्या भेदक माऱ्यामुळे सुरुवातीला बांगलादेशची ३ बाद १४ अशी अवस्था झाली. त्यानंतर बांगलादेशचा डाव सावरला नाही. पाहता पाहता बांगलादेशची ७ बाद ५६ अशी अवस्था झाली होती. त्यानंतर मेहरोब आणि अशिकूर झमान यांनी झुंज दिली. त्यांनी बांगलादेशला शतकी टप्पा पार करून दिला. ३६व्या षटकात अंगक्रिश रघुवंशीने मेहरोबला बाद करून ही जोडी फोडली. त्यानंतर बांगलादेशने फारसा प्रतिकार केला नाही. अखेरीस १११ धावांवर बांगलादेशचा डाव आटोपला. बांगलादेशकडून मेहरोबने ४८ चेंडूत सहा चौकारांसह सर्वाधिक ३० धावा केल्या.

स्कोअरबोर्ड : बांगलादेश - ३७.१ षटकांत १११ (मेहरोब ३०, मुल्ला १७, अशिकूर झमान १६, रविकुमार १४-३, विकी ओस्तवाल २५-२, अंगक्रिश रघुवंशी ४-१, राजवर्धन हंगर्गेकर १९-१, कौशल तांबे २७-१) पराभूत वि. भारत - ३०.५ षटकांत ५ बाद ११७ (अंगक्रिश रघुवंशी ४४, रशीद शेख २६, यश धूल नाबाद २०, कौशल तांबे नाबाद ११, रिपन मंडल ३१-४).

शाहरुख, साई किशोरला राखीवमध्ये स्थान

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

आक्रमक फलंदाज एम. शाहरुख खान आणि फिरकी गोलंदाज आर. साई किशोर यांची वेस्ट इंडिजविरुद्ध मर्यादित षटकांच्या क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघात राखीव म्हणून निवड झाली आहे. शाहरुख आणि साई किशोर यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये तमिळनाडूकडून खेळताना चमक दाखवली आहे.

भारत-विंडीज मालिका

भारत-विंडीजदरम्यान तीन वनडे आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका होणार आहे. यातील पहिली वन-डे सहा फेब्रुवारीला खेळली जाणार आहे. गेल्या वर्षी भारतीय संघ श्रीलंका दौऱ्यावर गेला होता. त्या वेळी साई किशोरला नेटमधील गोलंदाज म्हणून संघात स्थान देण्यात आले होते. शाहरुख खानने आतापर्यंत 'फिनिशर' म्हणून भूमिका चोख निभावली आहे. सईद मुश्ताक अली करंडक क्रिकेट स्पर्धेत कर्नाटकाविरुद्ध अखेरच्या चेंडूवर षटकार ठोकून शाहरुखने तमिळनाडूला जेतेपद मिळवून दिले होते. याच लढतीत साई किशोरने तीन विकेट घेतल्या होत्या. अर्थात, दोन्ही खेळाडूंना अंतिम अकरामध्ये स्थान मिळवण्यासाठी प्रतीक्षा करायी लागणार आहे. संघात आक्रमक फलंदाजांचा भरणा असून, कुलदीप यादव, यझुवेंद्र चहल, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल असे फिरकी गोलंदाज आहेत. लवकरच हे दोन्ही खेळाडू भारतीय संघासोबत जैव-सुरक्षित वातावरणात दाखल होतील. यामुळे या दोनही खेळाडूंना रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या सुरुवातीच्या काही लढतींना मुकावे लागणार आहे.

एकमेकांचा आधार हीच ताकद

वृत्तसंस्था, कूलिज (अँटिग्वा)

'कुणी मागे पडत असेल, तर आम्ही एकत्र येऊन त्याला आधार देतो. एकमेकांचा आधार हीच आमची खरी ताकद आहे,' अशी प्रतिक्रिया भारतीय १९ वर्षाखालील क्रिकेट संघाचा कर्णधार यश धुलने व्यक्त केली. भारताने वर्ल्ड कप १९ वर्षाखालील वनडे क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केल्यानंतर यशने ही भावना व्यक्त केली.

भारताचा युवा कर्णधार यश धुल याची प्रतिक्रिया

भारतीय संघाची उपांत्य फेरीत लढत चार वेळा विजेतेपद जिंकलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध होईल. भारताने साखळीत पहिल्या लढतीत दक्षिण आफ्रिकेला नमविले होते. यानंतर

आयर्लंड-झिम्बाब्वे लढतीत भूकंपाचे धक्के

पोर्ट ऑफ स्पेन : आयर्लंड आणि झिम्बाब्वे यांच्यातील वर्ल्ड कप १९ वर्षाखालील वनडे क्रिकेट स्पर्धेतील लढत सुरू असताना भूकंपाचे धक्के बसले. या लढतीचे थेट प्रक्षेपण सुरू असल्याने हे भूकंपाचे धक्के कॅमेरात टिपले गेले. जवळपास २० सेकंद हे धक्के जाणवत होते. अर्थात, मैदानावरील खेळाडूंना हे भूकंपाचे धक्के जाणवले नाहीत. मात्र, समालोचकांना याची कल्पना आली. हा भूकंप ५.२ तीव्रतेचा होता.

भारताच्या सहा खेळाडूंना करोनाची लागण झाली होती. आयर्लंडविरुद्ध अखेरचे अकरा खेळाडू मैदानात उतरले आणि त्यांनी विजय साकारला. यानंतर युगांडालाही भारताने नमविले. बांगलादेशविरुद्धच्या लढतीपूर्वी निशांत सिंधूला करोना झाला. मात्र, भारतीय संघाचा आत्मविश्वास जराही कमी झालेला नाही. करोनातून सावरून यश धूलने बांगलादेशविरुद्ध पुनरागमन केले. तो म्हणाला, 'संघाचा समतोल उत्तम आहे. प्रत्येकाला आपल्या जबाबदारीची जाणीव आहे. आमच्यासाठी हा आयुष्यभराचा अनुभव आहे.'

भारताच्या युवा संघाला राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे (एनसीए) अध्यक्ष व्हीव्हीएस लक्ष्मण यांचे मार्गदर्शन लाभले. यशने यावेळ लक्ष्मण यांचे आभार मानले. तो म्हणाला, 'दिवसागणिक आमची कामगिरी सुधारते आहे. लक्ष्मण सरांनी त्यांचा अनुभव आम्हाला सांगितला. त्याचा आम्हाला खूप फायदा झाला. आता आमही उपांत्य फेरीवर लक्ष केंद्रित केले आहे. त्या दिवशी खेळपट्टी कशी राहिल, यावर सारे काही अवलंबून असेल.'

आफ्रिका कपमध्ये कॅमेरून उपांत्य फेरीत

डिआला (कॅमेरून) : कॅमेरूनने आफ्रिका कप फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. कार्ल टोको इकाम्बी याच्या दोन गोलमुळे कॅमेरूनने गाम्बियाला २-० असे पराभूत केले.

पूर्वार्धातील गोलशून्य बरोबरीनंतर इकाम्बी याने सात मिनिटांच्या अंतराने दोन गोल केले. कॅमेरूनसमोर आता इजिप्त आणि मोरोक्को यांच्यातील विजेत्यांचे आव्हान असेल.

दरम्यान, बुर्किनो फासो संघानेही उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यांनी ट्यूनिशियाला १-० असे नमवले. नवोदित आक्रमक जेगे ओटारा याने पूर्वार्धातील भरपाई वेळेत निर्णायक गोल केला. बुर्किनास अखेरच्या दहा मिनिटात दहा खेळाडूंसह खेळण्ये भाग पडले, पण त्यांनी विजयाची संधी दवडली नाही. त्यांची आता लढत सेनेगल आणि इक्वेटोरिया यांच्यातील विजेत्यांविरुद्ध होईल.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध द. कोरिया विजयी

म. टा. क्रीडा प्रतिनिधी, मुंबई/पुणे

जि सो युनच्या गोलमुळे दक्षिण कोरियाने आशियाई महिला फुटबॉल स्पर्धेत विजेतेपदाचे प्रबळ दावेदार मानले जात असलेल्या ऑस्ट्रेलियास १-० असे पराभूत केले. रविवारी झालेली ही लढत जिंकून दक्षिण कोरियाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. वर्ल्ड कप पात्रता निश्चित करण्यासाठी दक्षिण कोरियाला विजय आवश्यक होता. चेल्सीकडून खेळणारी मध्यरक्षिका जि सो युन हिने दोन मिनिटे शिल्लक असताना गोल करून कोरियास विजयी केले.

चीनने व्हिएतनामचा ३-१ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. विजयाचा आनंद साजरा करताना चीनच्या खेळाडू.

जपानचे सात गोल

जपानने थायलंडचा ७-० असा धुव्वा उडवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. युईका सुगासावा हिने चार गोल करून या विजयात मोलमाची कामगिरी बजावली. थायलंड संघातील अनेक खेळाडूना करोनाची लागण झाली आहे. त्यामुळे जपानचे पारडे जड होते. जपानने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करीत विजय संपादला.

GODFREY PHILLIPS INDIA LIMITED

CIN: L16004MH1936PLC008587:

website:www.godfreyphillips.com; email: isc-gpi@modi.com

Extract of unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2021

(Rs. in Lakhs)

Sl. No.	Particulars	Standalone			Consolidated		
		Quarter ended 31.12.2021	Nine Months ended 31.12.2021	Quarter ended 31.12.2020	Quarter ended 31.12.2021	Nine Months ended 31.12.2021	Quarter ended 31.12.2020
1	Total Income from Operations	86661	236407	82724	86723	237544	84082
2	Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	15785	42087	15235	15693	42822	16235
3	Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items)	15785	42087	15235	15693	42822	16235
4	Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	11799	32807	11416	11701	33429	12274
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	11506	32123	11116	11110	33710	12221
6	Equity Share Capital	1040	1040	1040	1040	1040	1040
7	Basic and Diluted Earnings per Share (of Rs.2 each) (Rs.) (*not annualised)	22.69*	63.10*	21.96*	22.51*	64.30*	23.61*

Notes:

1. The above is an extract of the detailed format of Statements of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2021 ("These Results") filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. These Results and this extract were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at the meeting held on January 29, 2022. These Results are available on the Company's website (www.godfreyphillips.com) and on the websites of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).
2. The Limited Review, as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, has been completed on These Results and the Limited Review Reports of the Auditors have been filed with the Stock Exchanges. The Limited Review Reports do not have any impact on These Results which needs to be explained.

Registered Office: 'Macropolo Building', Ground Floor, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033.

For and on behalf of the Board
(Dr. Bina Modi)
Managing Director

Place: New Delhi
Dated: January 29, 2022

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर

ई-मेल:- director@mahadgm.gov.in

दिनांक- ३१ जानेवारी २०२२

निविदा मागणी सूचना

"चुनखडी, ग्रॅफाईट, आयर्न ओर व बॉक्साईट खनिजांचे खनिपट्टा आणि कॉपर, कॉपर व गोल्ड, आयर्न ओर, बॉक्साईट, मॅगनीज ओर व बेस मेटल्स खनिजांचे संयुक्त परवाना मंजुरीस्तव मागणी पत्रक"

खाण व खनिजे (विकसन व नियमन) अधिनियम, १९५७ च्या कलम १० (ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन आणि खनिज लिलाव नियम-२०१५ अंतर्गत अधिसूचित केलेल्यासार महाराष्ट्र शासनाने खनिज क्षेत्र जसे चुनखडी, ग्रॅफाईट, आयर्न ओर व बॉक्साईट खनिजांचे खनिपट्टा आणि कॉपर, कॉपर व गोल्ड, आयर्न ओर, बॉक्साईट, मॅगनीज ओर व बेस मेटल्स खनिजांचे संयुक्त परवाना यांची लिलावाकरिता निवड केलेली असून याद्वारे खनिपट्टा व संयुक्त परवाना मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे :-

अ) ८ (आठ) खनिज क्षेत्र [४ (चार) क्षेत्र चुनखडकाकरिता, २ (दोन) क्षेत्र आयर्न ओर करिता आणि प्रत्येकी १ (एक) खनिज क्षेत्र बॉक्साईट आणि ग्रॅफाईट करिता] इलेक्ट्रानिक लिलावासाठी आणि खनिपट्टा मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे.

ब) ८ (आठ) खनिज क्षेत्र [२ (दोन) क्षेत्र बॉक्साईट करिता, २ (दोन) क्षेत्र आयर्न ओर करिता आणि प्रत्येकी १ (एक) खनिज क्षेत्र मॅगनीज ओर, कॉपर, कॉपर व गोल्ड आणि बेस मेटल करिता] इलेक्ट्रानिक लिलावासाठी आणि संयुक्त परवाना मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे. खनिज क्षेत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	खनिज क्षेत्राचे नाव	खनिज ओर	सद्यस्तीचा प्रकार
१.	देवलमारी कोटेपल्ली चुनखडक क्षेत्र	चुनखडक	खनिपट्टा
२.	कोहाळा चुनखडक क्षेत्र	चुनखडक	खनिपट्टा
३.	पारडी (किनवट) चुनखडक क्षेत्र*	चुनखडक	खनिपट्टा
४.	टोगरघाव चुनखडक क्षेत्र*	चुनखडक	खनिपट्टा
५.	माडली लोहखनिज क्षेत्र	लोहखनिज	खनिपट्टा
६.	भिसी लोहखनिज क्षेत्र*	लोहखनिज	खनिपट्टा
७.	पिखलगाव (पश्चिम) बॉक्साईट क्षेत्र*	बॉक्साईट	खनिपट्टा
८.	चिटकारी ग्रॅफाईट क्षेत्र*	ग्रॅफाईट	खनिपट्टा
९.	पलीचे बॉक्साईट क्षेत्र	बॉक्साईट	संयुक्त परवाना
१०.	दक्षिण पडवे बॉक्साईट क्षेत्र	बॉक्साईट	संयुक्त परवाना
११.	अजगांव लोहखनिज क्षेत्र	लोहखनिज	संयुक्त परवाना
१२.	खातडां लोहखनिज क्षेत्र	लोहखनिज	संयुक्त परवाना
१३.	लांजेना फुटाळा मॅगनीज क्षेत्र	मॅगनीज	संयुक्त परवाना
१४.	मिस्ताही कॉपर क्षेत्र*	कॉपर	संयुक्त परवाना
१५.	घनपूर धूमोडी (पश्चिम) कॉपर व गोल्ड क्षेत्र*	कॉपर व गोल्ड	संयुक्त परवाना
१६.	बामणी बेस मेटल क्षेत्र	बेस मेटल	संयुक्त परवाना

टिप :- * ने दर्शविलेल्या खनिज क्षेत्रांचा लिलाव "दुसरा प्रयत्न" (Second attempt) म्हणून घेण्यात येत आहे.

निविदा दस्तऐवजाची किंमत प्रत्येक खनिज क्षेत्राकरिता रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) जीएसटी सह.

त्यानुसार वित्तीय निविदा फक्त आकडे स्वरुपात आणि तांत्रिक निविदा ही दोनही (हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी) स्वरुपात पात्र बोलीधारकाकडून मागविण्यात येत आहे.

ई-लिलावामध्ये भाग घेणेकरिता पात्रता अटी, दिनांक आणि वेळ, निविदा पध्दतेमध्ये अंतर्भूत केलेली आहे.

सविस्तर निविदा पध्दति सोबत मूलत अटची (कालावधी), अधिसूचना, अद्यावत सुधारणा आणि इतर सविस्तर माहिती ही खनिज क्षेत्राच्या ई-लिलाव प्रक्रियेकरिता फक्त इलेक्ट्रानिक स्वरुपात उपलब्ध आहे आणि MSTC Limited http://mstcecommerce.com/auctionhome/mlcl/index.jsp) या संकेतस्थळावरुन डाऊन लोड करता येईल.

इच्छुक व पात्र बोलीधारक उपरोक्त संकेतस्थळावर नोंदणी करु शकतात. यशस्वी नोंदणी प्रक्रियेनंतर पात्र बोलीधारकांना लॉगइन नोंदणी क्रमांक व पासवर्ड प्राप्त करता येईल. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणेसत्व पासवर्ड आवश्यक राहील. नमुना निविदा दस्तऐवज व खनिज क्षेत्राबाबत संक्षिप्त माहिती ही वरील संकेतस्थळावर मोफत उपलब्ध आहे.

लिलावाबाबत मुख्य कार्यक्रम आणि त्यांचा कालावधी खालीलप्रमाणे :-

कार्यक्रमाचे वर्णन	दिनांक
निविदा मागणी सूचना प्रसिद्धीचा दिनांक	३१ जानेवारी २०२२ (सोमवार)
निविदा पूर्व बैठक	१५ फेब्रुवारी २०२२ (मंगळवार)
निविदा फी रु. ५ लाख (५,००,००/-) चा भरणा केल्यानंतर प्रसिध्द खनिज क्षेत्राकरिता निविदा पत्रिका खरेदी करण्याची अंतिम तारीख	२४ फेब्रुवारी २०२२ (गुरुवार)
तांत्रीक निविदा (Technical bid) आणि Initial Price offer सादर करण्याचा अंतिम दिनांक	०३ मार्च २०२२ (गुरुवार)

DGIPR/2021-2022/3999

Siyaram's

PREMIUM SUITINGS & SHIRTINGS

SIYARAM SILK MILLS LTD.

CIN : L17116MH1978PLC020451

Regd. Office: H-3/2, MIDC, 'A' Road, Tarapur, Boisar, Dist. Palghar, PIN 401 506 (M.S.),
Phone - 7506794051; Email - sharedept@siyaram.com; Website - www.siyaram.com

EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31ST DECEMBER, 2021.

(₹ In Lakhs)

PARTICULARS	Standalone					Consolidated				
	Quarter Ended 31.12.2021 (Unaudited)	Quarter Ended 30.09.2021 (Unaudited)	Quarter Ended 31.12.2020 (Unaudited)	Nine Months Ended 31.12.2021 (Unaudited)	Year Ended 31.03.2021 (Audited)	Quarter Ended 31.12.2021 (Unaudited)	Quarter Ended 30.09.2021 (Unaudited)	Quarter Ended 31.12.2020 (Unaudited)	Nine Months Ended 31.12.2021 (Unaudited)	Year Ended 31.03.2021 (Audited)
Revenue from Operations	56,249	47,991	38,235	1,27,506	1,08,752	56,319	48,037	38,299	1,27,670	1,08,925
Other Income	865	650	893	2,274	4,069	865	650	885	2,274	4,084
Total Income	57,114	48,641	39,128	1,29,780	1,12,821	57,184	48,687	39,184	1,29,944	1,13,009
Net Profit for the period Before Tax	9,203	7,167	3,855	18,098	523	9,162	7,130	3,801	17,982	347
Net Profit for the period After Tax	6,906	5,326	2,805	13,522	534	6,865	5,289	2,751	13,406	358
Total Comprehensive Income	6,889	5,306	2,794	13,466	694	6,841	5,263	2,730	13,344	489
Paid up Equity Share Capital (Face value of ₹ 2/- per share)	937	937	937	937	937	937	937	937	937	937
Earnings Per Share (of ₹ 2/- each) Basic and Diluted (₹) (not annualised)	14.73	11.37	5.98	28.85	1.14	14.64	11.29	5.87	28.60	0.76

Notes :

1. The above Unaudited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the quarter and nine months ended December 31, 2021 have been reviewed by the Audit Committee and thereafter approved by the Board of Directors at their meeting held on January 29, 2022. The Statutory Auditors have carried out a limited review of these results.
2. The Board has declared 2nd Interim Dividend of ₹ 3/- (150%) per equity share of ₹ 2 /- each. The cash outgo on account of Interim Dividend will be ₹ 14.06 Crores.
3. The above is an extract of the detailed format of Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the quarter and nine months ended 31st December, 2021 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of quarterly financial results are available on the Stock Exchange websites, www.nseindia.com and www.bseindia.com and on the Company's website www.siyaram.com.

For SIYARAM SILK MILLS LTD.
Sd/-
(Ramesh Poddar)
Chairman & Managing Director
DIN : 00090104

Place : Mumbai
Date : 29/01/2022

J.HAMPSTEAD WORLD'S FINEST FABRIC & APPAREL | MiSTAIR IMPACT DRESSING A quality product from Siyaram's | Siyaram's ROYALE LINEN premium linen fabric | OXEMBERG | Siyaram's MOZZO | Siyaram's INSPIRO